2016-17

डायमंड पब्लिकेशन्स

२६४/३ शनिवार पेठ, ३०२ अनुग्रह अपार्टमेंट, तिसरा मजला, ऑंकारेश्वर मंदिराजवळ, पुणे-४११ ०३०
दूरध्वनी क्र. : (०२०) २४४५२३८७, २४४६६६४२. ई-मेल : info@diamondbookspune.com

श्री शिवछत्रपती महाविद्यालय
बोडकेनगर, जुन्नर (पुणे)
आवक नंबर - 582/1
दिनांक 16/12/2016

जावक क्र. डी.पी./२०१६-१७ क्र. ७८
दि. १३/१२/२०१६

प्रति,
मा. प्राचार्य
श्री शिवछत्रपती कॉलेज
जुन्नर जि. पुणे

**विषय : पुस्तक प्रदर्शन भरविण्याविषयी...**

मा. महोदय,

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आपल्या सोयीनुसार जानेवारीच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यामध्ये पुस्तक प्रदर्शन भरवण्याची परवानगी आम्हांला देण्यात यावी ही विनंती.

सदर प्रदर्शनासाठी लागणारे टेबल, खुर्ची हे साहित्य व राहाण्याची व्यवस्था कृपया करण्यात यावी ही विनंती.

धन्यवाद,

आपला
पाटे द.गं.

**दत्तात्रेय गं. पाष्टे**
**डायमंड पब्लिकेशन्स**

L.N.T.

Scanned by CamScanner

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे
**श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)**
एस./आर.नं. महा./ ६६७/ पुणे, दिनांक २/१/१९७० **कला - वाणिज्य - विज्ञान** पी.टी.आर. एफ.: ४३९/ पुणे, दिनांक ३१/१२/१९६९
'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्राप्त - पुणे विद्यापीठ
प्रभारी प्राचार्य डॉ. भास्कर शेळके एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
मोबाईल नं. ९८९०६ ८६५२१
'नॅक' - मुल्यांकीत 'अ'
• बोडकेनगर, जुन्नर, जि. पुणे, पीन: ४१० ५०२.
• दूरध्वनी क्र. : ०२१३२-२२२०९४ • फॅक्स: ०२१३२-२२२१५०
• वेब साईट: www.ssccollegejunnar.com • ई-मेल: ssccj@yahoo.co.in

जावक क्रमांक - एसएससीसीजे : Lib/291/2016-17 दिनांक : 29-12-2016

प्रति, info@diamondbookspune.com

मा. व्यवस्थापक,
डायमंड पब्लिकेशन्स,
२६४/३ शनिवार पेठ,
३०२ अनुग्रह अपार्टमेंट,
ओंकारेश्वर मंदिराजवळ,
पुणे ४११०३०

**विषय: ग्रंथप्रदर्शनाबाबत**

संदर्भ: आपले पत्र डी.पी.क्र. २०१६-१७/७८ दि. १३/१२/२०१६

महोदय,

आपल्या उपरोक्त संदर्भांकित पत्रानुसार आम्ही आपणास आमच्या महाविद्यालयात दि. ६ - ८ जाने. २०१७ या कालावधीत ग्रंथप्रदर्शन भरविण्यास परवानगी देत आहोत. प्रदर्शन भरविण्यासाठी आपणास पुरेशी जागा व फर्निचर महाविद्यालयामार्फत उपलब्ध करुन दिले जाईल. तसेच आपल्या निवासाची व्यवस्था महाविद्यालयाच्या अतिथीगृहात केली जाईल. प्रदर्शनात वाचकांना जास्तीत जास्त विषयांवरील पुस्तके पाहण्यासाठी व खरेदीसाठी प्रदर्शित करावीत ही विनंती.

कळावे

आपले

ग्रंथपाल
श्री शिव छत्रपती महाविद्यालय
जुन्नर, जि. पुणे.

प्रभारी प्राचार्य
श्री शिवछत्रपती महाविद्यालय
जुन्नर (पुणे)

Scanned by CamScanner

पुणे, बुधवार, ११ जानेवारी २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

# जुन्नरमधील ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

जुन्नर, ता. १० : जुन्नर येथील ग्रंथ प्रदर्शनात पोलिस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या 'मन मे हैं विश्वास' या पुस्तकास तरुणांकडून विशेष पसंती मिळाली. तीन दिवस चाललेल्या ग्रंथ प्रदर्शनास सुमारे तीन हजार ग्रंथप्रेमींनी भेट देऊन पुस्तकांची खरेदी केली.

श्री शिवछत्रपती महाविद्यालयात डायमंड पब्लिकेशनच्या वतीने ६ ते ८ जानेवारी या कालावधीत या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य भास्कर शेळके, डायमंड पब्लिकेशनचे दत्तात्रेय पाष्टे, संस्थेचे सहसचिव सुभाष कवडे, ग्रंथपाल लक्ष्मण थोरात यांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्‍घाटन झाले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तसेच पालक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या ग्रंथ प्रदर्शनास तीन दिवसांत भेट दिली. महिला वर्गाकडून पाककृती, हस्तकला व विद्यार्थ्यांकडून व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धा परीक्षा, ज्येष्ठांकडून धार्मिक पुस्तकांना मागणी होती. या प्रदर्शनात मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांतील ५० प्रकाशकांची वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तके प्रदर्शित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची सवय वाढीस लागावी या हेतूने दर वर्षी ग्रंथ प्रदर्शन व विक्री हा उपक्रम महाविद्यालयाच्या वतीने राबविला जात असल्याचे प्राचार्य डॉ. शेळके यांनी सांगितले.



जुन्नर : श्री छत्रपती महाविद्यालयातील प्रदर्शनात पुस्तके पाहताना विद्यार्थी.

Scanned by CamScanner

कोला | गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ७२०६३/१९९९ । वर्ष : १८ अंक : ११९

लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : २० (१२+८) किंमत : ₹ ४.००

पुणे (जिल्हा), बुधवार, दि. ११ जानेवारी २०१७

# समाजात वाचनसंस्कृती अद्याप टिकून : पाष्टे

**जुन्नर** : जुन्नरमधील शिवछत्रपती महाविद्यालयात डायमंड पब्लिकेशनच्या वतीने भरविण्यात आलेल्या ग्रंथप्रदर्शनाला सुमारे ३ हजार पुस्तकप्रेमींनी भेट देऊन पुस्तकांची खरेदी केली; त्यामुळे समाजात वाचनसंस्कृती टिकून असल्याचे मत डायमंड पब्लिकेशनचे संचालक दत्तात्रय पाष्टे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने दि. ६ ते ८ जानेवारी या कालावधीत हे ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव सुभाष कवडे यांच्या हस्ते करण्यात आले.

महाविद्यालयातील विद्यार्थी-प्राध्यापकांबरोबरच परिसरातील विविध क्षेत्रांतील ग्रंथरसिकांनी, शिक्षक, पालक, शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांनी भेट देऊन ग्रंथखरेदी केली.

महिलावर्गाकडून पाककृती, हस्तकला, बालवाङ्मय, विद्यार्थ्यांकडून व्यक्तिमत्त्वविकास, स्पर्धा परीक्षा, चरित्र वाङ्मय तर ज्येष्ठांकडून धार्मिक पुस्तकांना मागणी होती. (वार्ताहर)

Scanned by CamScanner